पोलीस ठाणे शिवाजीनगर ता.जि.बीड.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0368 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/07/2023 23:01 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 10/07/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/07/2023

**Time From (वेळेपासून):** 16:44 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:44 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/07/2023 **Time (वेळ):** 22:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/07/2023 22:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 02 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सह जिल्हा निबंधक कार्यालय, मुद,बीड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विलास साहेबराव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सावतानगर, गेवराई तागेवराई जि.बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सावतानगर, गेवराई तागेवराई जि.बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद गिरीधर मुनेश्वर | | | 1. कमला निवास, लांडगे यांचे घर, न.बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय बीड

दिनांक:- 10/07/2023.

मी विलास साहेबराव शिंदे, वय-57 वर्ष, व्यवसाय शेती, रा.शिराळा पोस्ट केकत पांगरी ता.गेवराई जि.बीड ह.मु.सावतानगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड मो.क्र.9175113282, 7276113282

आज दिनांक 10/07/2023 रोजी मी व माझे वकील श्री.इंदर नागरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे हजर येवुन श्री.अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचेकडे पंचासमक्ष तक्रार दिली की, "मी मुद्रांक शुल्क भरुन चलन पावती व हुकुमनामा प्रमाणीत करुन मिळण्याकरीता माझे वकील श्री.इंदर नागरे यांचे मार्फतीने सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे अर्ज दिला होता. सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथील लिपीक श्री.मुनेश्वर हे मुद्रांक शुल्क भरुन चलन पावती व हुकुमनामा प्रमाणीत करुन देण्यासाठी शासकीय फिस 600/-रुपये व स्वत:साठी 900/-रुपये असे एकुण 1500/-रुपयाची मागणी करीत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 10/07/2023 रोजी लिपीक श्री.मुनेश्वर हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री.बेटकर यांना सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे लिपीक श्री.मुनेश्वर यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/धस यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पोनि/धस यांनी स्वत:, दोन्ही पंच व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री.बेटकर यांना सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे लिपीक श्री.मुनेश्वर यांचेकडे पाठवुन पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व लिपीक श्री.मुनेश्वर यांची सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे भेट झाली. भेटी दरम्यान माझी व लिपीक श्री.मुनेश्वर यांचेत माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान लिपीक श्री.मुनेश्वर यांनी "वकील साहेब नाही का आले, त्यांना सांगीतलं होतं पंधराशे रुपये लागतेन म्हणुन, सांगीतलं असेल ना त्यांनी " असे म्हणुन मुद्रांक शुल्क भरुन चलन पावती व हुकुमनामा प्रमाणित करुन देण्यासाठी माझ्याकडे मुद्रांक शुल्कासह एकुण 1500/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1500/-रुपये लागलीच स्वत: स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानुसार पोनि/धस यांनी मला व दोन्ही पंचांना लिपीक श्री.मुनेश्वर यांचेविरुध्द लागलीच लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/धस यांनी सापळा कारवाईसाठी ए○थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचांना माहिती देऊन प्रात्यक्षिक

करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/घस यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 1500/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 3 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री.जाधव यांचे कल्वी नमुद करुन घेतले व त्यास ऍन्थ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/घस यांनी मला लिपीक श्री.मुनेश्वर यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 1500/-रु. काढुन द्याव्यात व लाचरक्कम स्विकारल्यानंतर पोनि/घस यांना मोबाईलवर कॉल करुन "वकील साहेब, काम झाले" असे बोलावे असा इशारा नेमुन दिला.
त्यानंतर पोनि/घस यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री.बेटकर यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 1500/-रु. लाच रक्कम लिपीक श्री.मुनेश्वर यांना देण्यासाठी सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/घस सापळा पथकासह शासकीय वाहनाने येत होते. मी व पंच क्रमांक 1 श्री.बेटकर असे माझेकडील मोटार सायकलने सह जिल्हा निबंधक कार्यालय, बीड येथे गेलो. त्याठिकाणी माझी व लिपीक श्री.मुनेश्वर यांची भेट झाली. भेटीदरम्यान श्री.मुनेश्वर यांनी मला "एवढा उशीर असतय का, साहेब गेले ना, आज होणार नाही " असे म्हणाले त्यावर मी त्यांना उद्या करा, किती देऊ मग अशी विचारणा केली तेव्हा श्री.मुनेश्वर यांनी "द्या ना पंधराशे रुपये, सांगीतले होते ना ते" असे म्हणुन पैशाची मागणी केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने पॅंटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 1500/- रुपये बाहेर काढुन लिपीक श्री.मुनेश्वर यांचे समोर धरले असता, त्यांनी सदरची लाच रक्कम ही उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांचे समोरील टेबलवर ठेवली. त्यानंतर मी लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 16.44 वा. केला.
इशारा प्राप्त होताच पोनि/घस, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र. 2 श्री.जाधव हे तात्काळ घटनास्थळी हजर आले. पोशि/गवळी यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/घस यांनी लोकसेवक श्री.मुनेश्वर यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/घस यांनी पंच क्र.-1 श्री.बेटकर यांना पंच क्रमांक 2 श्री.जाधव यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.बेटकर यांनी सांगीतले की, "लिपीक श्री. मुनेश्वर यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन 1500/-रु. लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांचेसमोरील टेबलवर ठेवली आहे. "असा खुलासा पंच क्र.1 श्री.बेटकर यांनी केला.
पोनि/घस यांनी लोकसेवक श्री.मुनेश्वर यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव विनोद गिरीधर मुनेश्वर, वय-32 वर्ष, व्यवसाय-नौकरी, कनिष्ठ लिपीक, सह जिल्हा निबंधक कार्यालय, मुद्रांक विभाग, बीड रा.दराटी, ता.उमरखेड, जिल्हा यवतमाळ ह.मु.कमला निवास, लांडगे यांचे घर, गोविंद नगर, नगर रोड, बीड (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/घस यांनी लिपीक श्री.मुनेश्वर यांना 1500/-रु. लाचरकमे बाबत विचारणा केली असता, लिपीक श्री.मुनेश्वर त्यांनी लाच रक्कम त्यांचे समोरील टेबलवर असल्याचे स○ांगितले. पोनि/घस यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री.जाधव यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. पंच क्रमांक 1 श्री.बेटकर यांनी सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या लाचेच्या नोटांचे क्रमांक वाचुन दाखवले असता पंच क्रमांक 2 श्री.जाधव यांनी लिपीक श्री.मुनेश्वर यांनी स्विकारलेल्या लाचेच्या नोटा व सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांचे क्रमांक व वर्णन तंतोतंत मिळुन आल्याचे सांगीतले. पोनि/घस यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/घस यांनी लिपीक श्री.मुनेश्वर यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी समोरच्या टेबलवरुन कागदपत्र काढुन पोनि/घस यांचेकडे दिले असता, सदर कागदपत्रावर पोनि/घस व पंचांनी सह्या करुन स्वत:चे ताब्यात घेतले. पोनि/घस यांनी श्री.राजेश पृथ्वीराज राठोड, प्रशासकीय अधिकारी, सह जिल्हानिबंधक कार्यालय, बीड यांना लिपीक श्री.मुनेश्वर यांचेवरील कारवाईची माहिती दिली व माझे कामासंबंधीचे कागदपत्र श्री.राजेश राठोड, प्रशासकीय अधिकारी दाखवुन हुकुमनामा प्रमाणीत करुन देण्यासाठी मुद्रांक शुल्क किती लागतो याबाबत विचारले तेव्हा श्री.राजेश राठोड यांनी माझे कागदपत्रांची पाहणी करुन मुद्रांक शुल्क 500/-रुपये व नोंदणी फिस 100/-रु. असे एकुण 600/-रुपयाचे चलन असते असे सांगीतले. पोनि/घस यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/घस, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच व लिपीक श्री.मुनेश्वर असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे आलोत. वरील सर्व कारवाई बाबत दिनांक 10/07/2023 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे.
लिपीक श्री.मुनेश्वर यांनी मुद्रांक शुल्क भरुन चलन पावती व हुकुमनामा प्रमाणीत करुन देण्यासाठी माझ्याकडे मुद्रांक शुल्क व नोंदणीचे 600/-रुपये व स्वत:करीता 900/-रुपये असे एकुण 1500/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 1500/-रुपये लागलीच स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 10/07/2023 रोजी 16.44 वा. सह जिल्हा निबंधक कार्यालय, मुद्रांक विभाग, बीड येथे लाच रक्कम 1500/-रुपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता, त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी श्री.विनोद गिरीधर मुनेश्वर, वय-32 वर्ष, व्यवसाय-नौकरी, कनिष्ठ लिपीक, सह जिल्हा निबंधक कार्यालय, मुद्रांक विभाग, बीड रा.दराटी, ता.उमरखेड, जिल्हा यवतमाळ ह.मु.कमला निवास, लांडगे यांचे घर, गोविंद नगर, नगर रोड बीड (वर्ग-3) यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.
समक्ष

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**or** (किंवा)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SHAILESH DIWANRAO SHEJUL
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): PSI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठा.अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Ketan kashinath Rathod

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):